# सोलापूर जिल्ह्यात पोरीच हुश्शार ! गुणवत्तेत काकणभर सरसच!!

## इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही सावित्रीच्या लेकींचाच शानदार झेंडा!!!




दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवलेल्या सोलापूरच्या दमाणी शाळेतील सावित्रीच्या या लेकींना जणू आभाळही ठेंगणे झाले.

**जिल्ह्याचा यंदाचा निकाल ९२.८३ टक्के**

**गतवर्षीच्या तुलनेत ३.७७ टक्क्यांनी घटला निकाल**

**कॉपीमुक्त अभियानाचा दिसला 'करिष्मा'**

**१०० टक्के निकालाची घौडदौड अनेक शाळांनी राखली कायम**

**कॉपीमुक्त अभियानामुळे हुशार विद्यार्थ्यांना पुढे जाण्यास चांगली संधी**

**सांगोल्याची बाजी तर उत्तर, दक्षिण पिछाडीवर**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी– मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या दहावी इयत्तेच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (ता.१३) दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्याचा यंदाचा निकाल ९२.९३ टक्के लागला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ३.७७ टक्क्यांनी निकाल घसरला आहे. जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या कॉपीमुक्ती उपक्रमामुळे निकालात घट झाल्याचे चित्र पुढे आले आहे. दरम्यान सोलापूर जिल्ह्याच्या यंदाच्याही निकालात पोरीच हुश्शार ठरल्या आहेत. मुलींची टक्केवारी ९६.१० इतकी राहिली आहे. जिल्ह्यातील सावित्रीच्या लेकींनीच स्पीचच्या पुढे जाऊन दहावीच्या परीक्षेला शानदार बल्लेबाजी करीत यशस्वितेचा झेंडा रोवला आहे.जिल्ह्यात उत्तीर्ण मुलांची टक्केवारी ९०.०४ टक्के एवढी राहिली आहे.

दहावी परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यातून ६४ हजार ४५४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६३ हजार ८४९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते, त्यापैकी ५९ हजार २७७ विद्यार्थी पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाले आहेत. मुलींनी दरवर्षीप्रमाणे आम्ही मुलांपेक्षा सरस असल्याचे पुन्हा सिद्ध करून दाखविले आहे. मंगळवारी सकाळपासूनच दहावीच्या निकालाबाबत विद्यार्थी, पालक व शाळांमध्ये प्रचंड मोठी उत्सुकता होती. दुपारी एक वाजता विद्यार्थ्यांनी पालकांच्या मोबाईलवर, शाळेतील संगणकावर व आई-बाबांच्या कार्यालयात ऑनलाइन निकाल पाहिला. उत्तीर्ण झाल्यानंतर मुला-मुलींनी आनंद व्यक्त करीत एकच जल्लोष केला. सायंकाळी चारनंतर शहर व जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी जल्लोष करून आनंद व्यक्त केल्याचे दिसून आले.

दहावीच्या परीक्षेला सोलापूर जिल्ह्यातून ६४ हजार४५४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती त्यातील ६३ हजार ८४९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते यातील ५९ हजार २७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात ३४ हजार ७७३ विद्यार्थी परीक्षेला नोंदणी केले होते त्यातील ३४ हजार,४३२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि त्यातील ३१ हजार ०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९०.४ टक्के इतके आहे. त्याचबरोबर दहावीच्या परीक्षेला २९ हजार ६८१ मुलींनी नोंदणी केली होती. त्यातील २९, हजार ४१७ मुलींनी परीक्षा दिली आणि त्यातील २८ हजार २७२मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.१० टक्के इतके आहे.

### टॅलेंट विद्यार्थ्यांना पुढे जाण्याला जिल्हाधिकाऱ्यांचे 'आशीर्वाद'

टॅलेंट विद्यार्थ्यांना पुढे जाण्याला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संधी दिली. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान यशस्वीपणे राबवले.१५ कस्टडी केंद्र तयार केले होते. त्याशिवाय ४७ संवदेनशील केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले होते. परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. शिवाय सर्वच परीक्षा केंद्रांवरील हालचालींवर जिल्हा परिषदेत स्थापित केलेल्या वॉररूममधून लक्ष ठेवले होते. केंद्र प्रमख वॉररूमशी कनेक्ट केले होते. शिवाय पर्यक्षेकांची अदलाबदल केली होती. बैठे आणि भरारी पथके कार्यरत ठेवली होती. शिवाय जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम तसेच माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी विविध केंद्रांना भेटी दिल्या होत्या. त्याचा परिपाक जिल्ह्यातील दहावी बोर्ड परीक्षेत दिसला. गुणवंत विद्यार्थ्यांना टॅलेंटच्या आधारे पुढे जाण्याची संधी मिळाली. कॉपीबहाद्दरांना मात्र चांगलाच हाबडा बसल्याचे चित्र निकालातून दिसून आले. कॉपीमुक्त अभियानामुळे खरेखुरे टॅलेंट समोर आले.३.७७ टक्क्यांनी जिल्ह्याच्या निकालात घट झाली.

### सोमवारपासून अकरावी इयत्तेचे प्रवेश सुरु

दहावीचा ऑनलाईन निकाल मंगळवार जाहीर झाल्यानंतर आता सोमवार (ता.१९) पासून अकरावी इयत्तेच प्रवेश सुरु होणार आहेत. यंदा सोलापूर जिल्ह्यासह राज्यात प्रथमच ऑनलाईन पद्धतीने अकरावीची प्रवेश प्रक्रिया राबणार आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या ऑनलाईन अर्ज दाखल करता येणार आहे. त्यांना पसंतीच्या दहा महाविद्यालयांची नावे दाखल करता येतील. प्रवेश प्रक्रियेच्या तीन फेऱ्या होतील, यातून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील. शैक्षणिक संस्थांना जादा शुल्क प्रवेशासाठी घेता येणार नाही.५५ टक्के जागेवर सर्वसाधारण प्रवर्गातील तर ४५ टक्के जागांवर इतर जातीच्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातील. अत्यंत पारदर्शक पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबली जाणार असल्याने क्षमतेपेक्षा एकाही विद्यार्थ्याचा प्रवेश जादा होणार नाही. विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. सध्या प्रवेशाच्या धर्तीवर महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.

**– सचिन जगताप,** शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद सोलापूर

### तालुकानिहाय निकाल

| | |
|---|---|
| अक्कलकोट | ८०.०१ |
| बार्शी | ९२.७६ |
| करमाळा | ९१.१३ |
| माढा | ९०.७६ |
| माळशिरस | ९२.५६ |
| मंगळवेढा | ९०.७२ |
| मोहोळ | ९०.९६ |
| पंढरपूर | ८९.८४ |
| सोलापूर उत्तर, दक्षिण | ८८.८२ |
| सांगोला | ९३.३४ |

# मनीषा मानेला अखेर दोन दिवसांची पोलीस कोठडी; कोर्टात जोरदार युक्तीवाद; 'हायव्होल्ट' हरकतींचा सामना

- आर्थिक बाबींवरून मनीषा माने हिचा डॉ. वळसंगकरांना त्रास सुरू होता, असा पोलिसांचा कोर्टात दावा
- संशयित मानेच्या पोलिस कोठडीसाठी पोलिसांनी आणलेल्या नव्या पुराव्यांवर आरोपीच्या वकिलाचा जोरदार युक्तीवाद




✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**प्रसिद्ध न्युरोफिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्याप्रकरणात मंगळवार (ता.१३) येथील जिल्हा व सत्र न्यायालयामधील मुख्य न्यायदंडाधिकारी न्या. भंडारी यांच्यासमोर सुनावणी झाली. संशयित आरोपी मनीषा माने हिच्या तीन दिवसांच्या पोलिस कोठडी ची मागणी सरकारी पक्षाच्यावतीने करण्यात आली. संशयित मनीषा हिच्याच्या संबंधित आर्थिक अपहाराच्या गंभीरप्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस कोठडी मिळणे गरजेचे असल्याचा युक्तीवाद सरकारी बाजूने करण्यात आला. तथापी, डॉक्टरांच्या आत्महत्येशी आर्थिकबाबींचा कोठेच संबंध येत नाही, शिवाय आर्थिकबाबींची चौकशी करण्यासाठी यापूर्वी पोलीस कोठडी घेण्यात आली आहे, आता नव्याने ती घेण्याची गरज नसल्याची बाजू संशयित आरोपीचे वकील ॲड. प्रशांत नवगिरे यांनी जोरदारपणे मांडली. पोलीस कोठडी घेण्याच्या सरकार पक्षाच्या भूमिकेला नवगिरे यांनी जोरदार हरकत घेतली. यावेळी आत्महत्येस प्रवृत्त करण्यासंबंधी आणि आर्थिक अपहार यावर कायद्याचा किस पडला. जोरदार हरकती झाल्या. शेवटी दोन्ही बाजूने म्हणणे ऐकून मुख्य न्यायदंडाधिकारी न्या. भंडारी यांनी संशयित आरोपी मनीषा माने हिला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.**

डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी पोलिसांनी मोठा दावा केला आहे. वळसंगकर रुग्णालयाची प्रशासकिय अधिकारी मनीषा मुसळे माने हिचा आर्थिक बाबींवरून डॉ. वळसंगकर यांना त्रास सुरू होता, असा पोलिसांचा दावा आहे. त्यामुळे पोलिसांचा फोकस अजूनही मुसळे माने हिच्यावर आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज कोर्टात तपास अधिकारी अजित लकडे यांनी पोलीस कोठडीची मागणी केली होती.

### थेट जिल्हा व सत्र न्यायालयातून...

- मनीषा माने हिला १:१५ वाजण्यास सुमारास मोठ्या पोलीस बंदोबस्तात आणले कोर्टात
- दुपारी १:४५ दरम्यान सुरु झाले न्यायालयीन कामकाज
- मनीषा मानेचे वकिल ॲड. नवगिरेंचा २० मिनिटे युक्तीवाद
- दुपारी २:१५ दरम्यान या केसचे न्यायालयीन कामकाज समाप्त
- दोन्ही बाजूंच्या युक्तीवादानंतर दुपारी ३ नंतर निकाल देऊ असं सांगितलं न्या.भंडारी यांनी
- दुपारी ३ वाजून १६ मिनिटांनी पोलिस कोठडी सुनावल्याचा आदेश कोर्टातून आला बाहेर

### तब्बल १८ दिवसांनी दिसली आई; शिवम् अन् शुभम बिलगले मनीषांना

तब्बल १८ दिवस मनीषा माने या न्यायलयीन कोठडी होत्या. या दरम्यान शिवम् आणि शुभम या दोघा मुलांनी तुरुंगात जाऊन आपल्या आईला मनीषांना भेटण्याचा प्रयत्न केला होता. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना आपली आई मनीषा यांना भेटणं शक्य झालं नव्हतं. मात्र आज कोर्टात मनीषा यांना आणल्यावर दोघा मुलांची त्यांची भेट झाली. हे दोघेही जणू आईला बिलगले. बराच वेळ त्यांच्यामध्ये बोलणे झाले. या भेटीदरम्यान घरी कसे चाललले आहे? याची चौकशी मनीषा यांनी मुलांकडे केली. घराच्या बांधकामाचे काय? लाईटचा शॉक बसणार नाही, याची काळजी घ्या. माझी काळजी करु नका, धीर धरा, सर्व काही सत्य समोर येईलच, असे मनीषा यांनी मुलांना सांगितल्याची माहिती समोर आली.

### आरोपीच्या बाजूचा युक्तीवाद

#### मनीषा मानेचे वकिल ॲड. नवगिरेंनी केलेल्या युक्तीवादामधील संपादित मुद्दे :



- डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येचा मुद्दा असताना संशयित आरोपी मानेंच्या आर्थिक व्यवहाराचा मुद्दा येतोच कुठे?
- आत्महत्येचा मुळ मुद्दा बाजूला करुन संशिताच्या आर्थिक मुद्यावर फोकस करुन विपरित परिस्थिती निर्माण करण्याचा पोलिसांचा प्रयत्न
- आर्थिक व्यवहारासंबंधी चौकशीचा मुद्दा २३ एप्रिल २०२५ च्या रिमांड रिपोर्टमध्ये होता, त्यानुसार पोलिस कोठडी मिळाली होती, पुन्हा याच मुद्यावर पोलीस कोठडी मागणे संयुक्तीक नाहीच
- डॉक्टरांच्या आत्महत्येच्या चौकशीवर ठाम न राहता तपास अधिकारी शोधताहेत वेगळेच मुद्दे
- 'इज्जत' घालवते असा शब्दप्रयोग मनीषा मानेंनी ई–मेल, चिठ्ठी कुठेही वापरलेला नाही, तथाकथित सुसाईट नोटमध्येदेखील कुठे डॉक्टरांनी उल्लेख केलेला नाही, तेव्हा 'इज्जत' हा नवा जावई शोध कसा आणला?
- मनीषा मानेंनी डॉक्टरांना पाठविलेल्या ई–मेलमध्ये आर्थिकबाबींचा कोठेच उल्लेख नाही, डॉक्टरांच्या सुसाईट नोटमध्ये आर्थिक अपहारासंबंधी काहीच नमुद नाही, मग अपहाराचा, फसवणुकीचा मुद्दा नसताना मध्येच पोलिसांनी मुद्दा फोकस केला कसा?
- हॉस्पिटलमधील एखाद्या कर्मचाऱ्याच्या नावे साधारण ३९ लाख रुपये आहेत, याबाबीवरुन डॉ. वळसंगकर आत्महत्या कसे करतील?
- मनीषा मानेंना साधारण १ लाख ३६ हजार पगार होता, ३२ महिन्यांत त्यांच्या खात्यावर ३९ लाख ८७ हजार ६८० रुपये राहात याला अपहार कसे म्हणता येईल?
- मनीषा मानेच्या खात्यामध्ये ७० लाख ४३ हजार १६० रुपये असताना आयकर न भरल्याबद्दल संबंधित खाते रक्कम जप्त करेल किंवा अन्य कारवाई करेल, त्याचा पोलिस तपासाशी काय संबंध?
- डॉ. वळसंगकरप्रकरणी आर्थिक व्यवहार आणि आत्महत्या यांचा कोठेच दुरान्वयेसुद्धा संबंध नाही तरीपण पोलीस कोठडीची मागणी का?



### सरकारी बाजूचा युक्तीवाद

#### 'या' ९ कारणांवरुन मनीषा मानेची पोलिसांनी केली पोलिस कोठडीची मागणी

१) दि.१८/४/२०२२ ते ७/१२/२०२४ या कालावधीत मनीषा माने हिच्या बँक खात्यावर आलेल्या ३९ लाख ८७ हजार ६८० रुपयांची रक्कम कोणत्या कारणावरुन आली, त्याचा तपास करणे.

२) गौस जमादार, राजेश भागानगरे,रेणूका खेत्री,सविता धुमाळे, मळसिद्ध धुमाळे यांच्या बँक खात्यातून मनीषा माने हिच्या बँक खात्यात रक्कमा कशा आणि का आल्या? याची पडताळणी करणे.

३) ओपडीतून १० हजाराची रक्कम मनीषा माने हिने व्यक्ती पाठवून घेतली होती,यासबंधी माने आणि नमुद साक्षीदार यांची तोंड रुजवत घालून तसा पुरावा अभिलेखावर आणणे.

४) आयकर भरतेवेळी मनीषा माने हिच्या खात्यावर ७० लाख ४३ हजार १६० रुपये रक्कम असल्याचे दाखवले नाही, ही रक्कम तिच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांपेक्षा अधिक आहे का, याची चौकशी करणे.

५) आरोपीचे बँक खाते पाहता तिच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांशिवाय जादा रक्कम असल्याचे निष्पन्न झाल्याने सदरची रक्कम तिच्याकडे कोठून आली, याची पडताळणी करणे.

६) मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यावरुन मृत डॉ. वळसंगकरांनी संशयितास कामावरुन काढले, यादरम्यान तुम्ही मिळविलेली सगळी इज्जत धुळीला घालवते, अशी संशयित डॉ. वळसंगकरांना म्हणाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, यासंबधी आरोपीकडे सखोल चौकशी करणे.

७) डॉ.वळसंगकर हॉस्पिटलमध्ये आर्थिक गैरव्यवहार करताना संशयित मनीषा माने हिस इतर कोणी सहकार्य केले का? याचा तपास करणे.

८) आरोपी ही बदनामी करेल या भीतीने डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या केल्याचे गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झाले असून नमुद आरोपीस डॉक्टरांच्या बदनामीस कोणी सहकार्य केली आहे का? आरोपीने त्याच्याशी कट केला होता का? यासंबंधी तिच्याकडे चौकशी करणे.

९) आरोपीने तिच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांपैकी प्राप्त केलेली रक्कम कोठे वापरली किंवा तिचा कशाप्रकारे विनियोग केला, याचा तपास करणे,यासंबंधाने तपासण्यात आलेल्या साक्षीदारांसमक्ष संपरिक्षण करणे.

### संशयित मनीषा मानेची बँकेत तीन खाती

**पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ४२ साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आहे. मनीषा मुसळे माने हिने एसपी न्युरोसायन्स हॉस्पिटलमध्ये आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा पोलिसांचा आरोप आहे. विशेष म्हणजे तिच्या नावावर तीन बँक खाती असून त्यामध्ये सुमारे ७० लाख रुपये आढळले आहेत. या रकमेवर कोणताही कर भरलेला नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. बँक खात्यातील ७० लाख रुपयांपैकी ३९ लाख रुपये पगाराव्यतिरिक्त कुठून आले? याचा ठोस पुरावा आरोपीकडे नाही, असा युक्तिवाद पोलिसांनी केला. तसेच, मनीषा मुसळे माने हिने हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांना रोख स्वरूपात पैसे देऊन त्यांच्या खात्यातून स्वतःच्या खात्यात पैसे ट्रान्सफर करून घेतले, असा दावा पोलिसांनी केला. हा सर्व व्यवहार संशयास्पद असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.**

### खुद्द न्यायालयासदेखील पडला प्रश्न, आर्थिक अपहार अन् आत्महत्येचा संबंध कसा?

मनीष मानेच्या आर्थिक अपहाराच्या मुद्यांवर सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस कोठडी हवी, अशी जोरदार मागणी तपास अधिकारी यांनी मुख्य न्यायदंडाधिकारी न्या. भंडारी यांच्याकडे केली, त्यावेळी न्या. भंडारी म्हणाले की, आर्थिक अपहार अन् आत्महत्येचा संबंध कसा? दरम्यान सरकार पक्षाने आर्थिकबाबी आणि आत्महत्या यांचा कसा संबंध आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

### डॉ.वळसंगकरांना आर्थिक बाबींचा त्रास? छे! हे तर सगळं खोटं...तर मग आमच्याशी डॉक्टर बोलले असते..

डॉ शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्याप्रकरणी पोलिसांनी मोठा दावा केला आहे. वळसंगकर रुग्णालयाची प्रशासकीय अधिकारी मनीषा मुसळे माने हिचा आर्थिक बाबींवरून डॉ. वळसंगकर यांना त्रास सुरू होता, असा पोलिसांचा दावा आहे. तो त्यांनी आज कोर्टातसुद्धा जोरकपणे केला. त्याच आधारे पोलीस कोठडी घेतली. मात्र, डॉक्टरांचे अत्यंत जवळचे मित्र, नातेवाईक आणि हॉस्पीटलमधील काही कर्मचारी हे पोलिसांचा हा दावा मानायला तयार नाहीत.'डॉ.वळसंगकरांना आर्थिक बाबींचा त्रास?छे! हे तर सगळं खोटं...तर मग आमच्याशी डॉक्टर बोलले असते'अशाच बोलक्या प्रतिक्रिया या सर्व संबंधितांच्या आल्या.